सत्र खटला क्र. १२/२०२२
सरकार -वि- मोहम्मद शकिल
निशाणी क्रमांक-५५

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०३ याची जबानी**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - बुढण खा हैदर खा**
**वय - ५४ वर्ष, व्यवसाय – नोकरी (वन मजुर),**
**राहणार - राजूर ता. मोताळा, जि. बुलढाणा.**

**अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. व्ही. एम. बापट**

०१. मी १९८९ साला पासून वनमजुर म्हणून रोहिणखेड बिट मध्ये कार्यरत आहे. दि. १४/१०/२०१७ रोजी मी फिर्यादी सोबत पेट्रोलिंग करत असतांना एक ट्रॅक्टर गुळबेली शिवारामध्ये जात होते. सदर ट्रॅक्टर मध्ये वाळू होती. फिर्यादीने सदर ट्रॅक्टर गुळबेली शिवारमध्ये दत्तभवन जवळ अडविले. तयावेळी सदर ट्रॅक्टर चा मालक आरोपी क्र.१ तेथे आला व त्याने ट्रॅक्टर मधील रेती खाली करून ते घेवून गेला. सदर ट्रॅक्टर आरोपी क्र.२ चालवत होता. त्यानंतर फिर्यादीने वरिष्ठ अधिका-यांना फोनवरून घटनेची माहिती दिली. त्यानंतर वरिष्ठ अधिकरी घटनास्थळावर आले व फिर्यादीने पोलिस ठाणे धामणगांव बढे येथे घटनेची फिर्याद दाखल केली. आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहेत. ते तेच आहेत. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस. डी. रावत</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझी गुळबेली जंगलामध्ये ड्युटी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी कुठलेही ट्रॅक्टर पकडन्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने खोटी फिर्याद दाखल केली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by
RAJENDRAKUMAR
BABASAHEB GIRI
Date: 2025.12.18
11:09:23 +0545

मलकापूर.

दिनांक - १७/१२/२०२५

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

**CERTIFICATE**

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 17.12.2025 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 17.12.2025 |
| Date of uploading | : | 18.12.2025 |